**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार**
**मा.स्थायी समिती सभापती निवडीच्या सभेचे इतिवृत्त.**

**--*--**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ चे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे साठी दिनांक ०५-०८-२०१६ रोजी बोलाविलेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

--*--

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील आदेश मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील पत्र क्र.नपा/१/२/३३४४४/ २०१६ दिनांक २८/०७/२०१६.रोजीचे पत्रान्वये शुक्रवार दिनांक ०५-०८-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी होणा-या सभेकरीता मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी पिठासीन अधिकारी म्हणून मा.श्री.भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्राधिकृत केले. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतीची निवड करणेकामी बोलविण्यात आलेली मा.स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०५-०८-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमधील स्थायी समिती सभागृहात सुरू झाली. सभेस

मा.श्री.भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर हे पिठासीन अधिकारी म्हणून तर खालील प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | मा.श्री. अनिल वसंतराव बोरूडे |
| २ | मा.सौ. छाया सुरेश तिवारी |
| ३ | मा.सौ. विद्या दिपक खैरे |
| ४ | मा.श्री. श्रीपाद शंकर छिंदम |
| ५ | मा.सौ. उषा शिवाजीराव नलवडे |
| ६ | मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे |
| ७ | मा.श्रीमती.कलावती सुर्यभान शेळके |
| ८ | मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे |
| ९ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव |
| १० | मा.श्री.मुदस्सर जहॉगिर शेख |
| ११ | मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते |
| १२ | मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम |
| १३ | मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर |

सभेच्या कामकाजास सकाळी ११.०० वा. सुरूवात करण्यात आली. सभेच्या सुरूवातीस मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीची विषय पत्रिका सभेमध्ये वाचून दाखविण्यात आली. त्यानंतर नगरसचिव यांनी त्यांचेकडील दाखल नामनिर्देशन पत्रांचे पाकीट समक्ष उघडुन नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर केली.

मा.स्थायी समितीच्या सभापतीसाठी एका उमेदवाराची नगरसचिव यांचेकडे विहीत मुदतीत दाखल झालेली तीन (३) नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सुपुर्द करण्यात आली. मा.पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी ही माहिती उपस्थित सदस्यांना दिली. दाखल झालेले नामनिर्देशन पत्र खालील प्रमाणे.

१) श्री.सचिन तुकाराम जाधव

२) श्री.सचिन तुकाराम जाधव

३) श्री.सचिन तुकाराम जाधव

दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची सकाळी ११.१० वा.छाननी सुरू करण्यात आली.

प्रथमतः १) उमेदवार श्री.सचिन तुकाराम जाधव हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक - सौ.सुनिता भगवान फुलसौंदर व अनुमोदक - श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. त्यांचा अर्ज मंजूर करणेंत आला. या नामनिर्देशन पत्रावर उमेदवारानी स्थायी समिती सभापती म्हणुन काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

२) उमेदवार श्री.सचिन तुकाराम जाधव हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक - श्री.छिंदम श्रीपाद शंकर व अनुमोदक - सौ.नलवडे उषा शिवाजीराव हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. त्यांचा अर्ज मंजूर करणेंत आला. या नामनिर्देशन पत्रावर उमेदवारानी स्थायी समिती सभापती म्हणुन काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

३) उमेदवार श्री.सचिन तुकाराम जाधव हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. तसेच सुचक - श्री.बोरुडे अनिल वसंतराव व अनुमोदक - सौ.छाया सुरेश तिवारी हे स्थायी समिती सदस्य असुन त्यांची देखील उमेदवारी फॉर्मवर स्वाक्षरी आहे. त्यांचा अर्ज मंजूर करणेंत आला. या नामनिर्देशन पत्रावर उमेदवारानी स्थायी समिती सभापती म्हणुन काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर श्री.सचिन तुकाराम जाधव यांचे तीनही उमेदवारी अर्ज वैध असल्याची घोषणा करुन सकाळी ११.१० नंतर वैध अर्जांपैकी ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाची आहे, त्यांचेसाठी १५ मिनिटांची वेळ ( सकाळी ११.२५ वाजेपर्यंत ) देणेत आली. या विहित मुदतीत त्यांनी नामनिर्देशन उमेदवारी माघार घेतलेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ नियम अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती म्हणुन श्री. सचिन तुकाराम जाधव यांचा एकमेव उमेदवारी अर्ज असल्याने **"श्री.सचिन तुकाराम जाधव"** हे अहमदनगर महानगरपालिकेच्या **" स्थायी समिती सभापती "** पदी यथोचित रित्या बिनविरोध निवडुन आल्याचे मी पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी जाहीर करीत आहे. स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती श्री.सचिन तुकाराम जाधव तसेच सर्व स्थायी समिती सदस्य, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधु या सर्वांचे सहकार्याबद्दल आभार मानतो. व यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करतो.

स्वाक्षरी /-
पिठासीन अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,
स्थायी समिती सभापती निवड-२०१६.
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर
दिनांक : ०५-०८-२०१६.